नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २८५ | Issue - 285 | वार सोमवार दि. ३ मार्च २०२५ | Blow- Monday Date 3 March 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# आजपासून विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

## विरोधकांना विधिमंडळात चर्चेची पूर्ण संधी देवून त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली जातील : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रसिद्धीमाध्यमांनी विरोधकांचे काम करू नये. मी व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामध्ये कोणतेही 'शीतयुद्ध' नसून प्रसिद्धीमाध्यमांनी आमच्यामध्ये भांडणे लावणे चुकीचे असल्याचे परखड मतप्रदर्शन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी पत्रकार परिषदेत केले. तर मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीच्या अदलाबदलीचे आमच्यात 'अंडरस्टँडिंग' असल्याचे शिंदे यांनी मिश्कीलपणे पत्रकारांना सांगितले. महायुतीमध्ये सर्व पक्षांचे नेते एकत्र असून विरोधकांमध्ये मात्र फाटाफूट आहे. त्यांची संख्या कमी असली तरी त्यांचा योग्य सन्मान राखला जाईल आणि विधिमंडळात चर्चेची पूर्ण संधी देवून



त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली जातील, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

विधिमंडळ अधिवेशनपूर्व पत्रकार परिषदेत बोलताना फडणवीस यांनी महायुतीतील भांडणांच्या बातम्या, विरोधकांचे आरोप, अर्थसंकल्प व अन्य बाबींविषयी सविस्तरपणे भूमिका मांडली.

मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी आरोप झाल्याने व माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावल्याने त्यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांनी केली आहे. याबाबत विचारता फडणवीस म्हणाले, मुंडे यांच्याबाबत सरकारची भूमिका आधीच जाहीर केली आहे. तर कोकाटे यांच्या शिक्षेला न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली असून निकाल प्रलंबित आहे. त्यांना दोषी ठरविण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयालाही सत्र किंवा उच्च न्यायालयाने स्थगिती दिली, तर त्यांच्या राजीमान्याचा प्रश्नच येणार नाही. त्यामुळे कोकाटे यांच्याबाबत न्यायालयाच्या निर्णयानंतरच निर्णय घेतला जाईल. सुनील केदार किंवा अन्य मंत्र्यांबाबतही तत्काळ निर्णय झाला नव्हता, असे फडणवीस यांनी सांगितले.

### अर्थसंकल्पापूर्वीच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार

तीन बाजूला तीन तोंड असणारे विसंवादी असे महायुतीचे सरकार असून जनतेला न्याय देण्याची भूमिका बजावत नसल्यामुळे आणि सातत्याने विरोधी पक्षाला सापत्न वागणूक देत असल्यामुळे सरकारने आयोजित केलेल्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार घातल्याचे 'मविआ'च्या नेत्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना दोन वर्षांची शिक्षा होऊनही त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यास विलंब लावण्यात आला आहे. तसेच पुण्यातील स्वारगेट एसटी आगारात तरुणीवर बलात्काराच्या घटनेवर असंवेदनशील वक्तव्य करणाऱ्या गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार नसल्याचे मत विरोधकांनी व्यक्त केले.

'मुख्यमंत्री लाडकी बहीण'सह महत्त्वाच्या व लोकप्रिय योजना सुरूच राहणार असून त्या योजना बंद होणार असल्याचा विरोधकांकडून अपप्रचार सुरू असून त्यात कोणतेही तथ्य नाही. कोणत्याही महत्त्वाच्या योजना बंद होणार नाही, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली. योजनेतील अटींनुसार केवळ लाभार्थींच्या तपासणीचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पत्रकार परिषदेत मी मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर होतो व फडणवीस हे उपमुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर होते. पण आता आमच्या खुर्च्या बदलल्या असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांची खुर्ची मात्र कायम आहे. माझे व फडणवीस यांचे मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीबदलीचे 'अंडरस्टँडिंग ' असल्याचे शिंदे यांनी मिश्कीलपणे सांगितल्यावर हंशा पिकला. मी माझी खुर्ची कायम राखू शकलो, तुम्ही राखू शकला नाहीत, तर मी काय करणार, अशी 'मार्मिक' टिप्पणी पवार यांनी केल्यावर फडणवीस यांच्यासह सर्वांनाच हसू आवरणे कठीण झाले.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला दोन राष्ट्रीय पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंमलबजावणीत माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्याबद्दल महावितरणला शुक्रवारी गव्हर्नन्स नाऊ या प्रकाशनातर्फे नवी दिल्ली येथे आयोजित अकराव्या सार्वजनिक उद्योग पुरस्कार सोहळ्यात दोन राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.




महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी या यशाबद्दल कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. महावितरणला 'एक्सलन्स इन प्रोसेस इनोव्हेशन' आणि 'बेस्ट यूज ऑफ ऑटोमेशन अँड डिजिटल टेक्नॉलॉजीज' या दोन गटात सर्वोत्कृष्ट कामगिरीचे राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. महावितरणचे अधीक्षक अभियंता (नवीकरणीय ऊर्जा) निखिल मेश्राम यांनी कंपनीच्या वतीने हे पुरस्कार स्वीकारले.

अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनात राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये महावितरणची प्रमुख भूमिका आहे. विकेंद्रित स्वरुपात ठिकठिकाणी सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारून त्याद्वारे कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्याची ही योजना आहे.

सौर ऊर्जानिर्मिती पार्क उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जमिनीची आवश्यकता असते. महावितरणच्या वीजनिर्मिती केंद्रांपासून पाच व दहा किलोमीटर अंतरावरील जमिनी निश्चित करणे, सौर ऊर्जानिर्मीतीसाठी त्या भाड्याने मिळविणे, सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पांसाठी माहितीसाठा तयार करणे, प्रकल्पांची मंजुरी, योजनेची अंमलबजावणी करणे अशा सर्व कामांसाठी महावितरणने एक स्वतंत्र पोर्टल विकसित केले. त्यामुळे योजनेची अंमलबजावणी गतीने आणि पारदर्शक पद्धतीने करता आली. या कामगिरीमुळे महावितरणला 'एक्सलन्स इन प्रोसेस इनोव्हेशन', या गटात सर्वोत्कृष्ट कामगिरीचा पुरस्कार मिळाला.

महावितरणने वीज उपकेंद्रांची देखभाल करण्यासाठी आणि अत्याधुनिक कमांड अँड कंट्रोल सेंटर उभारणीमध्ये माहिती तंज्ञानाचा प्रभावी वापर केल्याबद्दल कंपनीला दुसरा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. राज्यातील ३,५६३ वीज उपकेंद्रांच्या देखरेखीसाठी 'सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम' बसविण्यात येत आहे. यामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसाठीच्या सौर ऊर्जीकरण होणाऱ्या २,७७३ उपकेंद्रांचा समावेश आहे. 'सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम'मुळे प्रत्येक वीज केंद्रातील विविध उपकरणांची स्थिती, बिघाड, विजेची मागणी व पुरवठा इत्यादींची माहिती तातडीने उपलब्ध होऊन निर्णय प्रक्रिया गतीमान होत आहे. महावितरणने मुख्यालयात विकसित केलेल्या कमांड अँड कंट्रोल सेंटरमुळे राज्यभरातील वीज पुरवठ्यावर देखरेख ठेवणे आणि महत्त्वाच्या बाबीत तातडीने निर्णय करणे शक्य झाले आहे. या उपक्रमात आर्टिफिशिअल इंटिलिजन्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज व मशिन लर्निंग या अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

## उत्तराखंडमधील मृतांची संख्या सात; आणखी तीन बेपत्ता कामगारांचे मृतदेह सापडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डेहराडून : उत्तराखंडच्या चामोली जिल्ह्यातील मानगावाजवळ झालेल्या हिमस्खलनानंतर बर्फाखाली अडकलेल्या आणखी तीन कामगारांचे मृतदेह रविवारी सापडले. त्यामुळे या दुर्घटनेतील मृतांची संख्या आता सातवर पोहोचली असून आणखी एका बेपत्ता कामगाराचा शोध तिसऱ्या दिवशीही सुरू आहे.

लष्कराच्या सीमा रस्ते संघटनेच्या छावणीवर शुक्रवारी हिमकडे कोसळल्यानंतर त्याखाली ५४ कामगार अडकले होते. त्यानंतर शोध मोहिमेत ४७ कामगारांना वाचवण्यात यश आले. त्यापैकी ४६ जणांना ज्योतिर्मठातील लष्कराच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून मणक्याला इजा झालेल्या अन्य एका कामगाराला ऋषिकेश येथील एम्समध्ये पाठवण्यात आले आहे अशी माहिती लष्कराच्या डॉक्टरांनी दिली. एकूण तीन कामगारांची प्रकृती गंभीर असल्याचे लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

सोमवारी चामोलीमधील हवामान बिघडण्याची शक्यता असल्यामुळे त्यापूर्वीच बेपत्ता कामगाराचा शोध घेण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी



हेलिकॉप्टर, कुत्रे आणि 'थर्मल इमेजिंग' तंत्रज्ञानाची मदत घेतली जात आहे. या दुर्घटनेत मरण पावलेल्यांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी ज्योतिर्मठ येथे पाठवण्यात आले आहेत.



## ...तर आम्ही थेट राजीनामा मागू : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाचा तपास एसआयटी, सीआयडी आणि न्यायलयीन समितीकडून चौकशी सुरु आहे. या प्रकरणात आता राज्य गुन्हा अन्वेषण विभागाने दोषारोपपत्र सादर केलं. यामध्ये वाल्मिक कराड हाच हत्येच्या प्रकरणात मुख्य सूत्रधार असल्याची माहिती समोर आली. दरम्यान, मंत्री धनंजय मुंडे यांचा वाल्मिक कराड हा निकटवर्तीय असल्याचा आरोप केला जातो. यावरून धनंजय मुंडे यांचा राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधक करत आहेत.

दुसरीकडे कृषीमंत्री ड.माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने दोन वर्षाच्या कारावासाची शिक्षा सुनावल्याप्रकरणी त्यांचाही राजीनामा घेतला जावा, अशी मागणी विरोधक करत आहेत. दरम्यान, या घटनेच्या संदर्भात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचक पण थेट इशारा देणारं विधान केलं. 'नैतिकतेचं अध:पतन झालं आहे असं वाटल्यास आम्ही थेट राजीनामा मागू', असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत सरकारकडून याआधीच भूमिका स्पष्ट करण्यात आलेली आहे. अनेकवेळा अशा प्रकारच्या प्रश्नांमध्ये राजीनामा द्यावा की नाही द्यावा? असे अनेक मुद्दे उपस्थित होतात. त्याबाबत आमच्याकडेही भरपूर चर्चा झालेली आहे. त्या चर्चेच्या अंती मी आपल्यासमोर वस्तुस्थिती मांडली. कुठेही नैतिकतेचं अध:पतन झालेलं आहे असं जर आमच्या लक्षात आलं तर आम्ही कोणालाही वाचवणार नाहीत. आम्ही थेट त्यांचे राजीनामे मागू, असा सूचक इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. तसेच माणिकराव कोकाटे यांच्यासंदर्भात क्लोअज फॉर ऑर्डर असल्यामुळे त्याबाबत आम्हाला सध्या कोणतीही भूमिका मांडता येत नाही, असल्याचंही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना आमची टीम जुनीच आहे, फक्त आमच्या दोघांच्या खुर्च्या बदलल्या आहेत, पण अजित पवारांची खुर्ची फिक्स असल्याचं मिश्कील वक्तव्य करत टोला लगावला. यावर लगेचच अजित पवार यांनीही उत्तर दिलं. तुम्हाला (एकनाथ शिंदे) खुर्ची (मुख्यमंत्री पदाची खुर्ची) फिक्स ठेवता आली नाही, त्याला मी काय करू, असं म्हणत अजित पवार यांनी एकनाथ शिंदेंची फिरकी घेतली. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील खळखळून हसल्याचं पाहायला मिळालं. यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की आमची रोटेटिंग चेअर आहे.

### वरूण चक्रवर्ती व टीम इंडियाचे फिरकीपटू ठरले स्टार

### न्यूझीलंडचा विजयरथ रोखला

# भारताचा न्यूझीलंडवर नेत्रदीपक विजय! ऑस्ट्रेलिया विरूद्ध खेळणार उपांत्य फेरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : श्रेयस अय्यरची ७९ धावांची खेळी, वरूण चक्रवर्तीचे ५ विकेट्स व फिरकीपटूंची भेदक गोलंदाजी या जोरावर भारताने न्यूझीलंडला नमवत ४४ धावांनी मोठा विजय नोंदवला. भारताच्या फिरकीपटू चौकडीने ९ विकेट्स घेत किवीच्या धावांना वेसण घातलं. या विजयासह भारताने गुणतालिकेत पहिलं स्थान गाठलं आहे. टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीत गट टप्प्यातील तिन्ही सामने जिंकत उपांत्य फेरीत पोहोचला आहे. यासह भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील उपांत्य फेरीचा सामना ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळवला जाणार आहे.

दुबई इंटरनॅशनल स्टेडियमवर रविवारी २ मार्च रोजी खेळल्या गेलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या शेवटच्या गट सामन्याकडे सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या. उपांत्य फेरीतील ४ संघ आधीच ठरले होते पण आता कोणता संघ कोणत्या संघाविरूद्ध खेळणार हे निश्चित होणं बाकी होत आणि ते भारत-न्यूझीलंड सामन्याच्या निकालावर ठरणार होते. यासह आता उपांत्य फेरीचे संघ ठरले असून भारत वि. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड वि. दक्षिण आफ्रिका हे संघ असणार आहेत.

भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीतील तिसरी नाणेफेक गमावली पण सलग तिसरा सामना मात्र जिंकला आहे. नाणेफेक गमावत भारतीय संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला होता आणि भारताची सुरूवात खूपच खराब झाली. भारताने ३० धावांमध्ये ३ विकेट गमावले होते. यानंतर श्रेयस अय्यरने अक्षर पटेलच्या साथीने ९८ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. श्रेयस अय्यरने ७९ धावांची



तर अक्षर पटेलने ४२ धावांची खेळी केली. न्यूझीलंडकरून वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीने ५ विकेट्स घेत भारताला जास्त धावा करण्याची संधी दिली नाही.

भारताने दिलेले २५० धावांचे लक्ष्य न्यूझीलंड सहज गाठेल असं वाटत होते. पण भारताने मोठी खेळी करत ४ फिरकीपटू खेळवले आणि किवी संघ फिरकीसमोर फेल ठरले. न्यूझीलंडचा फक्त केन विल्यमसन १२० चेंडूत ७ चौकारांसह ८१ धावा करत बाद झालाय याशिवाय कोणताही फलंदाज ३० धावांचा टप्पा गाठू शकला नाही. भारताच्या फिरकी गोलंदाजांनी किवी संघाला एकेका धावेसाठी मेहनत करायला लावली. अखेरीस भारताने न्यूझीलंडला सर्वबाद करत मोठा विजय नोंदवला.

भारताकडून वरूण चक्रवर्तीने १० षटकांत ४२ धावा देत ५ विकेट्स घेतल्या. तर अक्षर, जडेजा, हार्दिकने प्रत्येकी १-१ विकेट तर कुलदीपने २ विकेट्स घेतल्या. आपला पहिला चॅम्पियन्स ट्रॉफी सामना खेळत असलेल्या वरूणने भेदक गोलंदाजी करत सामनावीराचा पुरस्कारही पटकावला.

## संपादकीय....

### बहिष्कार

आजपासून विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महायुतीची पत्रकार परिषद पार पडली. यावेळी विरोधकांनी चहापानावर बहिष्कार टाकल्याने मुख्यमंत्री फडणवीसांनी विरोधकांना सुनावले आहे. तीन बाजूला तीन तोंड असणारे विसंवादी असे महायुतीचे सरकार असून जनतेला न्याय देण्याची भूमिका बजावत नसल्यामुळे आणि सातत्याने विरोधी पक्षाला सापत्न वागणूक देत असल्यामुळे सरकारने आयोजित केलेल्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार घातल्याचे 'मविआ'च्या नेत्यांनी सांगितले. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना दोन वर्षांची शिक्षा होऊनही त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यास विलंब लावण्यात आला आहे. तसेच पुण्यातील स्वारगेट एसटी आगारात तरुणीवर बलात्काराच्या घटनेवर असंवेदनशील वक्तव्य करणाऱ्या गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार नसल्याचे मत विरोधकांनी व्यक्त केले. दरम्यान महायुतीमध्ये सर्व पक्षांचे नेते एकत्र असून विरोधकांमध्ये मात्र फाटाफूट आहे. त्यांची संख्या कमी असली तरी त्यांचा योग्य सन्मान राखला जाईल आणि विधिमंडळात चर्चेची पूर्ण संधी देवून त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली जातील, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# १५०० श्री सदस्यांकडून पंढरपुरात स्वच्छता अभियान

## ३३ गाड्यांमधून २३ टन कचरा केला गोळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर शहरांमध्ये स्वच्छता बरोबर शेअर स्वच्छता करणाऱ्या १५०० श्री सदस्यांनी आज रविवारची औचित्य साधून स्वच्छतेच्या स्वयंपूर्ण कार्यक्रम राबवला. या स्वच्छता अभियानामध्ये २३ टन कचरा गोळा झाल्याची माहिती श्री सदस्यांनी दिली आहे.

महाराष्ट्र भूषण तीर्थरूप डॉक्टर श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंड तालुका अलिबाग यांच्या सौजन्याने पंढरपूर येथे स्वच्छता अभियान पंढरपूर येथे रविवार दिनांक २ मार्च २०२५ रोजी पद्मश्री मा आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉक्टर सचिन दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार पंढरपूर शहरात विविध ठिकाणी १५०० श्री सदस्यांमार्फत स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे. सकाळी नऊ वाजता या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून करण्यात आली.

या कार्यक्रमाला तहसीलदार सचिन लंगोटे पोलीस उपाधीक्षक पंढरपूर विभाग डॉक्टर अर्जुन भोसले प्रशासन अधिकारी उपमुख्य अधिकारी अँड सुनील वाळुंजकर, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, डॉक्टर शरद वाघमारे डॉक्टर तोडकर पंढरपूर शहरातील विविध असोसिएशनचे प्रमुख पदाधिकारी पंढरपूर शहरातील व्यापारी कमिटीचे अध्यक्ष सोमनाथ डोंबे संत एक गाडगेबाबांची राधे जी बादले पाटील, मेडिकल असोसिएशनचे प्रशांत खलीपे, करडईचे अमित शिरगावकर, राहणार असोसिएशनचे डॉक्टर मंदार सोनवणे, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहिमेची सुरुवात झाली.

या कार्यक्रमास संदीप मांडवे, प्रशांत शिंदे, विजय बर्वे, राहील बर्वे महाराष्ट्रातील पंढरपूर सांगोला अकलूज मंगळवेढा इत्यादी स्वच्छता मोहीम करणारे श्री सदस्य उपस्थित होते.



## आदिवासी कातकरी मुला मुलींची अनुदानित आश्रम शाळा बाबरेच्या मुलींचे सुयश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्था संचलित आदिवासी कातकरी मुला मुलींची अनुदानित आश्रमशाळा बाबरे, ता. शहापूर या आश्रम शाळेतील विद्यार्थीनी कुमारी रोहिणी जाधव व कुमारी गौरी पारधी या मुलींनी स्नेहश्री फाउंडेशन या संस्थेमार्फत आयोजित केलेल्या राज्यस्तरीय संविधान प्रास्ताविका पाठांतर स्पर्धेमध्ये यश मिळविले. प्रित्यर्थ महाराष्ट्र राज्याचे समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते शिवसेना भवन येथे सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्रालयाचे प्रधान सचिव विजय वाघमारे व उपसचिव रविंद्र जाधव यांना आदर्श कृतिशील मुख्याध्यापिका आशा नवनाथ रणखांबे यांनी विद्यार्थिनी समवेत भेटून शाळेची माहिती दिली. विशेष म्हणजे यांच्या पहिल्या पिढीने पुस्तकाला हात लावला आहे. आजही त्यांचे पालक विटभट्टीवर काम करीत आहेत. आम्हाला आय. ए. एस आय. पी. एस व्हायचे आहे अशी महत्वकांक्षाही व्यक्त केली. या दोन्ही विद्यार्थिनींचे सचिवांनी कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष समीर सीताराम गायकवाड यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिका संघटित व्हा व संघर्ष करा ! हा ध्यास आहे व त्याचे हे यश आहे असे सांगितले.

# पोलिसांनी संघभावना आणि पारदर्शकतेने काम करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय पोलिस क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचा समारोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे (जिमाका) : पोलिसांनी संघभावना आणि पारदर्शकतेने काम करावे. तर पोलिस खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थान मिळविण्यासाठी अधिक मेहनत घ्यावी, त्यासाठी शासन तुमच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहील, सर्वतोपरी मदत करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र पोलिसांना आज येथे आश्वासित केले.

येथील साकेत मैदान येथे आयोजित ३५ व्या राज्यस्तरीय पोलिस क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचा दिमाखदार समारोप सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी गृहराज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, गृहराज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर, आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, विशेष पोलिस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र डॉ.संजय दराडे,




जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

समारोप सोहळ्याची सुरुवात विविध पोलिस खेळाडू पथकांच्या संचलनाने झाली. यावेळी महिला आणि पुरुष गटातील १०० मीटर धावण्याच्या अंतिम स्पर्धाही पार पडल्या. विजेत्या खेळाडूंना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस खेळाडूंना प्रोत्साहन देताना सांगितले की, या स्पर्धांमध्ये राज्यभरातील २ हजार ९२९ पोलिस खेळाडूंनी सहभाग घेतला, ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे. अशा क्रीडा स्पर्धांमुळे पोलिस दलातील संघभावना अधिक बळकट होते. यापुढेही जास्तीत जास्त पोलिस खेळाडूंनी या स्पर्धांमध्ये भाग घ्यावा. महिला खेळाडूंची वाढती संख्या पाहून मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले आणि कर्तव्य व क्रीडा या दोन्ही जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

ते म्हणाले, पोलिस खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील यश मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. पोलिस कर्मचाऱ्यांसाठी आपली प्रतिभा दाखवण्याची ही एक उत्तम संधी आहे. ऑलिम्पिकसह सर्वोच्च स्तरावर आपले पोलिस खेळाडू स्पर्धा करू शकतील, यासाठी शासन सर्व प्रकारचे आवश्यक ते सहकार्य नक्कीच करेल. यानुषंगाने २०३६ च्या ऑलिम्पिकसाठी भारताच्या तयारीमध्ये पोलिस संघांना समाविष्ट करण्यासाठी मिशन ऑलिम्पिक सुरू करण्यात आले आहे.

महाराष्ट्र पोलिस दल देशातील सर्वोत्तम पोलिस दल म्हणून ओळखले जाते आणि त्याचा नावलौकिक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढला आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आणि महाराष्ट्राला आघाडीचे औद्योगिक केंद्र म्हणून मदत करण्यासाठी केलेल्या योगदानाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशंसा करुन राज्य पोलिसांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यावसायिकता आणि कामगिरीचा मानदंड प्रस्थापित केला आहे, असे त्यांनी शेवटी सांगितले.

महाराष्ट्र पोलिस दलाचा सन्मान आणि कर्तव्यदक्षता अधिक दृढ करण्याचा हा उत्सव यशस्वीरित्या संपन्न झाला.

याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस, गृहराज्यमंत्री योगेश कदम आणि पंकज भोयर यांचा पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या दिमाखदार सोहळयाचे उत्साहपूर्ण असे सूत्रसंचलन सचिन देवडे व श्वेता हुल्ले यांनी केले.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या विविध नियुक्ती जाहीर; पंढरपूर येथे पत्रकारांचा सन्मान सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या विविध न्यूटनची घोषणा करण्यात आली व या कार्यक्रमास सोलापूर जिल्ह्यातील पत्रकारांनी विविध विषयावर सखोल चर्चा केली व पंढरपुरातील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन वारकरी संप्रदायाच्या परंपराला उजाळा दिला. श्री डॉ. विश्वासराव आरोटे यांची महाराष्ट्र राज्य प्रदेश सचिव पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा पंढरपूर शहर व तालुका पत्रकार संघाच्या वतीने येथे यथोचित सन्मान करण्यात आला. पश्चिम महाराष्ट्र पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री राजेंद्र कोरके पाटील यांच्या शुभहस्ते श्री डॉक्टर विश्वासराव आरोटे यांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मूर्ती व शाल श्रीफळ देऊन गौरवण्यात आली.

तसेच दैनिक समर्थ गावकरीचे व्यवस्थापक श्री संजय फुलसुंदर ते प्रमुख उपस्थितीत होते त्यांचाही येतोच सन्मान करण्यात आला.



नंतर पंढरपूर शहर व तालुका पदाधिकाऱ्यांच्या पंढरपूर तालुका अध्यक्ष रवींद्र कोळी, तालुका कार्याध्यक्ष राजेंद्र करपे, तालुका उपाध्यक्ष नितीन खाडे, तालुका मुख्य मार्गदर्शक श्री रामदास नागटिळक. (कौठळी उपसरपंच) तालुका मुख्य संघटक रोहन नरसाळे, तालुका सचिव श्री अतुल मोरे, पंढरपूर शहराध्यक्ष श्री संतोष मोरे, शहर कार्याध्यक्ष श्री प्रमोद भोसले, शहर उपाध्यक्ष, संजय यादव, शहर सचिव कुमार कोरे, सर्व तालुका पदाधिकारी व मुख्य मार्गदर्शक श्री सचिन कुलकर्णी, ह भ प. श्री राजेश बादले पाटील. श्री धनाजी राक्षे मातोश्री वृद्धाश्रमाचे मॅनेजर, नागेशादापुरे, पंढरपूर शहर व तालुक्यातील पदाधिकारी ही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय बौद्ध महासभा अक्कलकोट तालुका अध्यक्षपदी बौद्धाचार्य साहिल कांबळे यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा शाखा सोलापूर जिल्हा पूर्व शाखेच्या वतीने अक्कलकोट कार्यकारणी निवड प्रक्रियेसाठी जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे,सरचिटणीस नागसेन माने जिल्हा संस्कार प्रमुख धम्मपाल माने,जिल्हा संघटक राजेंद्र माने यांची उपस्थिती होती.

महाकारूणी तथागत भगवान गौतम बुद्ध,बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन निवड प्रक्रिया जिल्हा कार्यकारणी तसेच प्रमुख उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले.

याचप्रमाणे त्रिसरण पंचशील घेऊन पूजा संपन्न करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे तसेच जिल्हा कार्यकारणी यांनी कार्यकारणी निवड प्रक्रिया प्रसंगी मार्गदर्शन केले

यानंतर अक्कलकोट तालुका कार्यकारणी निवड प्रक्रिया पार पडली यामध्ये तालुका अध्यक्ष बौद्धाचार्य साहिल कांबळे सरचिटणीस सचिन मोरे,कोषाध्यक्ष पंचशील सोनकांबळे उपाध्यक्ष संस्कार विभाग ज्योतिबा पारखे उपाध्यक्ष महिला विभाग पूजा बाबासाहेब घटकांबळे उपाध्यक्ष पर्यटन विभाग बसवराज गायकवाड उपाध्यक्ष संरक्षण राहुल भगळे सचिव महिला विभाग कमल धोंडीबा थोरे सचिव महिला विभाग वैशाली प्रभाकर खंडाळे ऑडिटर दिनेश गवळी सचिव संस्कार विभाग दर्शन गायकवाड सचिव संस्कार विभाग भोगेश सोबान सचिव संरक्षण विभाग राजरत्न थंब सुशील किरगल संघटक संघटक संदेश गायकवाड संघटक प्रताप घटकांबळे संघटक शेखर जैनजांगडे आदी सह तालुका पदाधिकारी निवड करण्यात आली.

भारतीय बौद्ध महासभा अक्कलकोट तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बौद्धाचार्य साहिल कांबळे यांनी कार्यकर्त्यांना बळ देऊन ऊर्जा निर्माण करणारे मनोगत व्यक्त केले.

या निवड प्रसंगी मा.उपसरपंच तथा विद्यमान ग्रां सदस्य मारुती घटकांबळे,अंबादास घटकांबळे, बसवराज गायकवाड, सम्राट सोनकांबळे,मारुती गायकवाड, सुनिल घटकांबळे,आदीसह बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना देशात व परदेशात नोकरी व संशोधनासाठी अनेक संधी : डॉ. प्रभाकर जाधव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

मराठा विद्या प्रसारक समाजाचे क.ग. दा. मोरे महाविद्यालय, निफाड येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस* कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रभाकर जाधव (शास्त्रज्ञ, कॅलिफोर्निया,णड) उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना देशात व परदेशात आपल्या ज्ञानाच्या जोरावर विविध नोकरीच्या व संशोधनाच्या संधी मिळवता येतील. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी आपल्या छोट्याशा कसबे सुकेणे या गावापासून ते यु.एस.ए. पर्यंतचा आपला प्रवास विद्यार्थ्यांपुढे मांडला.




शासनाच्या विविध शिष्यवृत्तीचा फायदा घेऊन परदेशात उच्च शिक्षणाच्या संधी साधता येतील असेही त्यांनी सांगितले. हुशार, कौशल्य संपन्न, कर्तव्यदक्ष व मेहनती मुलांची जगाला गरज आहे असे त्यांनी प्रकर्षाने सांगितले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेसेंटेशन व रांगोळी स्पर्धेत सहभाग सहभाग घेऊन विज्ञान विषयक दृष्टिकोन या माध्यमातून सादर केला. उपस्थित मान्यवरांनी रांगोळी व पोस्टर ची पाहणी केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. (डॉ) सुरेशजी जाधव हे उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात माननीय प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान विषयक दृष्टिकोन जागृत ठेवून निरीक्षण करावे व त्याचा उपयोग येणाऱ्या काळात संशोधनात करावा असे आव्हान केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सकाळ सत्र प्रमुख प्रा.वाय.डी. कडलग यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.बी.बी. मुन्तोडे यांनी केला कार्यक्रमासाठी आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एल. जे. सुसान सकाळ सत्र प्रमुख डॉ. पी. डी. ढेपले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पी.सी. खापरे यांनी केले व आभार प्रदर्शन श्रीमती एम. बी. बोराडे यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### दुचाकीच्या धडकेत मुलगा जखमी

सोलापूर, (प्रतिनिधी) : घरासमोर सायकल चालवत असताना फिर्यादी रेश्मा मशाक मुल्ला (वय-३३,रा.शिवलिंग नगर) यांचा मुलगा असद याला दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीजी.५१२४ यावरील चालकाने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने दुचाकी चालवून फिर्यादी यांच्या मुलाला पाठीमागून धडक देऊन त्याच्या मांडीचे हाड फॅक्चर होऊन गंभीर जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे.याप्रकरणी रेश्मा मुल्ला यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून सत्यनारायण व्यंकटेश बोल्ली (रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २४ फेब्रुवारी रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास शिवलिंग नगर येथे घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल डोके हे करीत आहेत.

### काटीकर हॉस्पिटल जवळून दुचाकी लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : काटीकर हॉस्पिटल जवळ हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३. डीसी.३६१८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २७ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी चंद्रकांत तिलोकचंद शहा (वय-४५,रा.पूर्व मंगळवार पेठ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पापडे हे करीत आहेत.

# कालवा सल्लागार समितीचे बैठकीत आ.समाधान आवताडे यांची तळमळ

## मतदार संघातील शेतकऱ्यांची अडचण दूर करण्यासाठीच आक्रमक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनीधी : पुणे येथे झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीसाठी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे पाणीदार आमदार समाधान आवताडे यांनी आवर्जून उपस्थित राहून, मतदारसंघातील पाण्यासाठी या बैठकीत आक्रमक होत शेतकऱ्यांची शेतीच्या पाण्याची अडचण दूर करण्यासाठीच मोठी तळमळ दिसुन आली.

सदरची बैठक राज्याचे उपमुख्यमंत्री .अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि जलसंपदा मंत्री .ना.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडली.

या बैठकीत नीरा डावा कालवा, नीरा उजवा कालवा या प्रकल्पांच्या उन्हाळी हंगाम २०२४-२५ साठी सिंचनाच्या पाण्याच्या नियोजनावरही यावेळी चर्चा करण्यात आली.नीरा भाटघर उजव्या कालव्याखालील सिंचन टेल टू हेड या पद्धतीने पद्धत राबवून प्रत्येक नळीवर बारकाईने लक्ष देऊन प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पाणी पोहोचणे गरजेचे आहे.

नीरा उजवा कॅनोलद्वारे शेती सिंचन अवघड झाले असून कासेगांव, अनवली, बोहाळी, टाकळी, कोर्टी, रांझणी, खर्डी, उंबरगाव, एकालासापूर, तावशी ही गावे ओलीताखाली आहेत मात्र अधिकाऱ्यांच्या चुकीच्या आणि गलथान कारभारामुळे बरेच शेतकरी गेल्या वर्षी पाण्यापासून वंचित राहिली होती तरी या चालू हांगमा मद्ये शेतकऱ्यांना पाणी पोहोचणे आवश्यक आहे. असे उपस्थीत अधिकारी यांना ठणकावून सांगितले.

भरणे न भिजता पर्क्यूलेशनच्या नावाखाली शेतकरी यांचेकडून बाक्या दुप्पट घेतल्या जातात. त्या बाक्या कमी करून मिळाव्यात.

पाणी मागणी फॉर्म भरणेसाठी मागील रक्कम २५ ते ३० टक्के भरून घेऊन पुढील फॉर्म भरून घ्यावे. पाणी न मिळाल्यास द्राक्ष, डाळिंब, बोर, इ. बागांचे शेतकऱ्याचे नुकसान मोठ्या प्रमाणात होत आहे.

नीरा भाटघरच्या प्रत्येक अधिकाऱ्याने त्या स्वतः साईटवर थांबून भरणे काढावेत. एका कर्मचाऱ्याला १०ते २०नाल्या दिल्या जातात. त्यामुळे पाण्याचे नियोजन होत नसून भरणे भिजत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी काळजी घेणे गरजेचे आहे. असेही आ समाधान आवताडे यानी सुचविले.

मार्च २०२४रोजी या उन्हाळी पाळीला भरणे न भिजवता पाणी पळवत वर नेले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या फळ बागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

उंबरगाव, बोहाळी, कोर्टी ओढ्यावरील बंधारे भरण्यात यावेत, कारण तिन्ही गावातील पिण्याचे पाण्याची विहिरी त्यावरती आवलंबून आहेत. यासह अनेक प्रश्न उपस्थीत केले.

यावेळी उपस्थित मंत्री महोदयांनी व अधिकारी वर्गाने सकारात्मकता दाखवत लवकरात लवकर सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.यावेळी राज्यमंत्री .ना.सौ.माधुरीताई मिसाळ, सार्वजनिक क्रीडामंत्री ना.दत्तात्रय मामा भरणे , माजी विधानपरिषद सभापती रामराजे निंबाळकर, आमदार उत्तमराव जानकर, आमदार राहुल कुल, माजी खासदार .रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार सातपुते, आ. श्सिद्धार्थ शिरोळे, आ. शंकर मांडेकर, आ.भिमराव तापकिर, आ. कांबळे आ. डॉ. .बाबासाहेब देशमुख, माजी मंत्री आमदार विजयबापू शिवतारे, राज्यसभा खासदार प्रा.डॉ.सौ.मेधाताई कुलकर्णी, आमदार हेमंत रासणे आदी मान्यवर सहकारी तसेच खात्यांचे प्रशासकीय अधिकारी पदाधिकारी उपस्थित होते.

### आ. आवताडे यांच्या मागणीची तत्काळ दखल

**शनिवारी पुणे येथे निरा उजवा आणि डावा कालवा मधून उन्हाळी पाळी बाबत बैठकीत चर्चा सूरू होती. लवकरात लवकर पाणी मिळावे ही मागणी आ. समाधान आवताडे यांनी लावून धरली होती. याची तत्काळ दखल घेतंली गेली आहे. यामुळे रविवारी पाणी सोडण्यात आले आहे. ही बाब शेतकऱ्यांना सुखद करणारी आहे. यामुळेच केवळ पोकळ गप्पा मारून वेळकाढूपणा नाही तर कर्तव्य बजावणारा आमदार म्हणूण मतदार संघात ओळख वाढू लागली आहे. याचीच प्रचिती म्हणूण मतदारानी दुसऱ्यांदा संधी दिली आहे**

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर जिल्ह्याच्या वतीने बौद्धांचे पवित्र ठिकाण बुद्धगया हे पूर्णपणे मुक्त करून बौद्धांच्या हाती सोपवण्यात यावे , तसेच गेल्या पंधरा दिवसापासून बौद्ध समाजाच्या व बौद्ध भिकूंचा आंदोलन सुरुवात असून उपोषण चालू आहे, हिंदूंच्या देवळात हिंदूंचे पुजारी, मुस्लिम समाजाच्या मध्ये मुस्लिम बांधवांचे मौलवी असतात, समाजाच्या मंदिरात जैन बांधवांचे पुजारी असतात, मग बौद्ध विहारात बौद्ध भिक्खूंच् असले पाहिजेअसे निवेदन वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर जिल्ह्याच्या वतीने




जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांच्या नेतृत्वाखाली,आज सोलापूर जिल्हाधिकारी माननीय कुमार आशीर्वाद साहेबयांना देण्यात आले .१९४९ च्या कायद्यानुसार बुद्धगया बुद्ध विहार व्यवस्थापन समितीमध्ये सहा पैकी तीन बौद्ध आणि तीन हिंदू सदस्यांची नेमणूक करण्यात आली होती सदरचा १९४९ चा कायदा पूर्णपणे रद्द करून बौद्धांच्या हातामध्ये बुद्धगया बुद्ध विहार सोपविण्यात यावे यासाठी वंचित बहुजन आघाडीची मागणी शासनापर्यंत करावी अशी विनंती जिल्हाधिकारी यांना करण्यात आली निवेदन देत असताना सोलापूर शहर जिल्ह्यातील जिल्हा महासचिव अनिरुद्ध वाघमारे, शहर अध्यक्ष प्रशांत गोणेवार , शहर महासचिव विनोद इंगळे, लोकसभा चे उमेदवार आतिश भैय्या बनसोडे, विधानसभा उत्तर चे उमेदवार विक्रांत गायकवाड, दक्षिणचे तालुका अध्यक्ष सुरेशदेशमुख विजय गायकवाड, रोहित लालसरे, आरती पारस्कर विजयकुमार उघडे, बंदे नवाज सय्यद, किरण साळवे, विशाल जेट्टी थोर,, विद्यार्थी संघटनेचे राज्य प्रवक्ता रविराज पोटे, अक्कलकोट तालुका उपाध्यक्ष बबन गायकवाड, बॅगेली शाखाध्यक्ष गंगाराम गायकवाड, चपळगाव चे बबलू गायकवाड, रवी थोरात माझी जिल्हा उपाध्यक्ष, पाटसकर ताई, यासह सर्व कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक लिंगायत महासभा दत्तवाड शाखेचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : दि.१ मार्च २०२५ रोजी दत्तवाड तालुका शिरोळ येथे जागतिक लिंगायत महासभा या लिंगायत समाजाच्या सर्वात मोठ्या संघटनेचा शाखा उद्घाटन समारंभ व पदाधिकाऱ्यांची निवड पत्र वाटप कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी राज्य अध्यक्ष राजशेखर तंबाखे, बसव कथाकार शिवानंद हैबतपुरे, जिल्हाध्यक्ष मनोजकुमार रणदिवे, अंबोळे, महाजन, कुंभार साहेब यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी राजगोंडा पाटील यांची जागतिक लिंगायत महासभेच्या कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.



कुमार हेरवाडे यांची दतवाड शाखेच्या अध्यक्षपदी तर बसगोंडा पाटील, सुनील कुंभार, प्रकाश पाटील,कलैया मठपती, सुधाकर पट्टेकरी, यांची उपाध्यक्षपदी तर कलगोंडा पाटील यांची जनरल सचिव पदी तसेच, व तसेच प्रविण स्वामी, संजय पाटील, शेखर अंबूपे , शिवराज सूर्यवंशी, युवराज आरोटे, सुनील खरोशे,यांची सचीव व तसेच अशोक नेर्ले, दरगोंडा नागराळे, बाळगोंडा आद्रशे, कुमार पाटील, शिवानंद खराडे, सिदगोंडा पाटील, अनिल टोपाई, आप्पासो कुंभार , महादेव मटाले, यांची सदस्य पदी निवड करण्यात आली.

यावेळी दत्तवाड लिंगायत समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंढरपुरात तलावात बुडून एका युवकाचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी

पंढरपूर येथील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या नगरपालिकेच्या जलतरण तलावात पोहण्यासाठी गेलेल्या एका २१ वर्षीय तरुणाचा पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडवून मृत्यू झाला आहे.



ही धक्कादायक घटना शनिवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. यामध्ये इसबावी परिसरातील यशराज विजय माने (वय २१) असे मृत तरुणाचे नाव आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार यशराज माने हा तरुण दुपारी आपल्या मित्रांसोबत नगरपालिकेच्या जलतरण तलावात पोहण्यासाठी गेला असता त्याचा पाण्यात बुडवून मृत्यू झाला. या प्रकरणी पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे.

टेंभुर्णी पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले विजय माने यांचा यशराज हा मुलगा आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेचा अधिक तपास पंढरपूर शहर पोलिस करत आहेत.

# वृध्द महिलेस नकली सोन्याचे बिस्कीट दाखवून असली एक तोळा सोन्याच्या गंठणला घातला गंडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड :

बसस्थानकावर किंवा आठवडी बाजारात,यात्रा वगरे ठिकाणी गर्दीचा फायदा घेत खिशातील मोबाईल,गळ्यातील गंठण मगळसुत्र, रोख रक्कम असा चोरीच्या घटना ह्या नव्या नाहीत पण अता चोराचा नवा फंडा नळदुर्ग बसस्थानक परिसरात पुढे आला असून दिवसा ढवळ्या सकाळी १०.३० ते १२. वाजण्या दरम्यान एका वृध्द महिलेस नकली सोन्याचे बिस्कीट दाखवू असली एक तोळा सोन्याचे गंठण जबरदस्तीने गळ्यातून काढून घेऊन चोरटे पसार झाल्याची घटना तुळजापूर तालूक्यातील नळदुर्ग बसस्थानक परिसरात घडली आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे की दि.२७ फेब्रुवारी २२५ रोजी नळदुर्ग पासुन जवळच अंतरावर असलेल्या वागदरी तालुका तुळजापूर येथील पार्वतीबाई रघुनाथ वाघमारे वय ७० वर्ष ही वृध्द महिला सकाळी ठिक१०.३० वा. दरम्यान दवाखान्यात उपचारासाठी एसटी बसने नळदुर्गला आली.बसस्थानकातून दवाखान्याकडे जाण्यासाठी एकटीच पायी चालत निघाली असता बसस्थानका समोरच राष्ट्रीय महामार्ग ओलांडून ती नळदुर्ग शहरात प्रवेश करणाऱ्या रोडवरील



राष्ट्रीय महामार्ग लगतच असलेल्या भाजी विक्रते व कुरेशी यांच्या किराणा दुकाना समोर आली असता दोन अज्ञात तरुण तिच्या जवळ आले. त्यांनी त्यांच्या जवळ असलेले छोट्या कापडाच्या चिंदीत बांधलेले छोट गाठोडं त्या वृध्द महिलेच्या पायाजवळ टाकले दोघा पैकी एकाने ते गाठोडं उचलले अरे यात पैसे आहेत आजीला पण हिस्सा द्याव लागेल चल आजी पैसे वाटून देतो म्हणून हाताला धरून ती नको म्हनत असताना देखील त्यानी त्या वृद्ध महिलेस बसस्थानका समोर जवळच अंतरावर असलेल्या जिल्हा परिषद प्रशाला (मुलांची) नळदुर्ग च्या पटांगणात निर्मणूष्य ठिकाणी घेऊन गेले.ती गोधळून गेली होती घाबरली होती.असा अवस्थेत एकाने ते छोटे गाठोडं सोडले. अरे व्वा आजीचे नशिब चांगले आहे.यात सोन्याची बिस्किटे आहेत आजी तुझ्या गळ्यातील गंठण दे आणि हे सोन्याचे बिस्कीट घे असे म्हणून तीला काही कळण्या आगोदरच तिच्या गळ्यातील गंठण काढले व नकली सोन्याचे बिस्किट लाल कागदात गुंडाळून दिले.ती घरी वागदरीला आल्या नंतर घडला प्रकार तिने आपला मुलगा अनिल रघुनाथ वाघमारे याना सांगीतला त्याने त्या बिस्किटावर हातोडा मारून बघितले तर ते कॅडबरी चॉकलेटच्या अकाराच्या छोटय लोखंडी पट्टीला सोनेरी रंग दिल्याचे आढळून आले. आपली मोठी फसवनूक झालचे आजीच्या लक्षत आले असता त्यानी आपला मुला सोबत नळदुर्ग पोलीससे ठाणे गाठले व घडल्या घनेटनेची लेखीतक्रार दिल आहे .या बाबत नळदुर्ग व पारिसरात एकच खळबळ उडाली असून नळदुर्ग बसस्थानक परिसरात चोरीच्या घटनेचे प्रमाण वाढले असून नळदुर्ग पोलिसा समोर हे एक मोठे आव्हान निर्मान झाले आहे.

**नळदुर्ग पोलीस ठाणे हद्दीतील घटना**

## वीज वितरण चां भोंगळ कारभार

## वीजपुरवठा सुरु न झाल्यास आंदोलनाचा इशारा

# पाणी आहे पण वीज नाही; शेतकरी चिंतेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वरकुटे मलवडी/प्रतिनिधी : शेती पिकविण्यासाठी पाणी आणि वीज आवश्यक आहे.शेतकऱ्यांना थोडेसे पाणी आहे तर वीज नाही अशी अवस्था वरकुटे परिसरात झाली आहे. आता कडक उन्हाळा सुरू झाला आहे. पाण्याची पातळी खालावली आहे थोडेसे पाणी आहे पण वीज मात्र १० मिनिट ही नियमित टिकत नाही आता शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे आता शेतकऱ्याची पिके काढणीच्या मोसम मध्ये आहेत आणि वीज नाही त्यामुळे पिके जळून गेली आहेत आणि काही जळायला लागली आहेत याला जबाबदार फक्त आणि फक्त वीज वितरण कंपनी आणि कर्मचारी आहेत शेतकऱ्यांना वाली कोण आहे का असा सवाल संतप्त शेतकऱ्यांतून होत आहे.महावितरण कडून चोवीस तांसातून आठ तास थ्री फेज वीज व सोळा तास सिंगल फेज वीज पुरविली जाते परंतु तसे न होता फक्त चार तास थ्री फेज सोडत असतात आणि यातही जास्तीत जास्त एक तास वीज टिकत आहे तेही वीस मिनिटे वीज चालू राहते आणि नंतर वीस मिनिटे बंद राहते शेतकऱ्यांनी दारावर पाणी जाते न जाते तोपर्यंत बंद होते असे कायम होत आहे शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेती फुलवण्याचे उद्देश डोळ्यासमोर ठेऊन काम करत आहेत शेतकऱ्याची



अवस्था असून खोळंबा आणि नसून तोटा अशी झाली आहे .शेतकऱ्यांना वाली नाही शेतकऱ्याकडे ना लोकप्रतिनिधी चे लक्ष ना नेत्यांचे लक्ष सर्वच आपापल्या कामात व्यस्त अशी अवस्था झाली आहे महावितरण ने फक्त बिले वसुली यावर लक्ष दिले असून यांना शेतकऱ्यांचे हित काय समजणार सरकार शेतकऱ्यासाठी विविध योजना राबवत आहे परंतु वीज वितरण पुढे शेतकऱ्याचा इलाज संपला. शेतकऱ्यांना आठ च तास थ्री फेज वीज वितरण करा परंतु नियमित वितरण करावी अशी शेतकऱ्यांची मागणी आहे अशी मागणी जोर धरू लागली आहे. ०३ मार्च पर्यंत वीज वितरण सुरळीत झाले नाही तर वीज वितरण कंपनी कार्यालय दहिवडी या ठिकाणी गुरुवार सहा मार्च रोजी हजारो शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते श्री प्रा. सचिन होनमाने यांनी दिली आहे

# भाजपा किसान मोर्चा तालुका उपाध्यक्षपदी सुरेश शिवरकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी



सुरेश शिवरकर गेली १० वर्षापासुन भाजपाचे कार्यकर्ते म्हणुन चिखली तालुक्यात काम करत आहे पक्षाच्या विवीध कामात ते नेहमी काम करत असतात त्यामुळे चिखली तालुका भाजपा किसान मोर्चा च्या तालुका उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली मा.डीगाबरभाऊ जाधव पाटील ता.अध्यक्ष भाजपा किसान मोर्चा यांनी सुरेश शिवरकर यांची निवड केली यांनी निवडीचे श्रेय

चिखली मतदार संघाच्या आमदार सौ. श्वेताताई महाले पाटील डॉ.गणेशजी मांटे जिल्हा अध्यक्ष भाजपा सुधाकर गिते प्रदेश सहसंयोजक भाजपा किसान मोर्चा संतोषबापु देशमुख जिल्हा अध्यक्ष उध्दवराव पवार जिल्हा महामंत्री संदीपभाऊ बोर्डे जिल्हा उपाध्यक्ष किसान मोर्चा नंदकीशोर गुजकर रामभाऊ जाधव राजेश अभोरे आत्माराम मोरे व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते यांना दीले.

## थोडक्यात...

### मित्रनगर जवळ रिक्षाची दुचाकीला धडक

सोलापूर (प्रतिनिधी) मित्रनगर ते शेळगी या रस्त्यावरील रिक्षा क्रमांक एमएच.१३.सीटी.२९८१ यातील चालक इरफान पठाण याने त्याच्या ताब्यातील रिक्षा भरधाव वेगात चालवून फिर्यादी उमा जनार्दन शिंदे (वय-४५,रा.कुमार स्वामी नगर,मित्र नगर,शेळगी) यांच्या पतीच्या दुचाकीस समोरून जोराची धडक देऊन त्यांना गंभीर दुखापत होण्यास कारणीभूत झाला आहे.याप्रकरणी उमा शिंदे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून इरफान पठाण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २८ फेब्रुवारी रोजी दुपारी पावणे एक वाजण्याच्या सुमारास घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल साळुंखे हे करीत आहेत.

### तरुणास लोखंडी पाईपने मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) तरुणास लोखंडी पाईपने मारहाण केल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २८ फेब्रुवारी रोजी प्रताप नगर येथे घडली.याप्रकरणी शिल्पा रवींद्र पवार (वय-३८,रा.लोकु तांडा,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून भारत चव्हाण (रा.कुलकर्णी तांडा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी यांचा मुलगा श्रेयस हा तांड्या मागील कॅनॉल जवळ खेळत असताना वरील संशयित आरोपी याने श्रेयश याला लोखंडी पाईपने व हाताने मारहाण करून जखमी केले.तसेच फिर्यादी यांनी विचारणा केली असता,फिर्यादीस देखील शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.

### रिक्षात प्रवासादरम्यान चोरट्याने पळवला मोबाईल

सोलापूर (प्रतिनिधी) रिक्षात प्रवास करत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादी छोटूकुमार बच्चुराम कुमार (वय-२०,रा.मु.पो. सावळेश्वर,तालुका मोहोळ) या तरुणाचा दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना २५ फेब्रुवारी रोजी साडेसहा ते साडेसात वाजण्याच्या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे घडली.याप्रकरणी छोटूकुमार याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल घुगे हे करीत आहेत.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला सर्वधर्मसमभावाचा विचार देशाला तारणारा

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले; काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हा समतेचा संग्राम ठरला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक / मुंबई दि.२ महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हा समतेच्या न्यायाच्या मानवतेच्या हक्काचा संग्राम ठरला आहे.मानवमुक्तीचा संग्राम ठरला. जगभर मानवी हक्काचा लढ्यातील समतेचा संगर म्हणून काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह लढ्याचा इतिहास आजही प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज नाशिक येथे केले.

काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या ९५ व्या वर्धापन दिनी काळाराम मंदिर पूर्व दरवाजा येथे काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्यास्मरणार्थ उभारण्यात आलेल्या कीर्तिमान शिलालेख येथील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास ना .रामदास आठवले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन




करण्यात आले.यावेळी बौद्ध भंते आणि सर्व बौद्ध उपासकांनी सामूहिक बुद्ध वंदना घेतली.

यावेळी काळाराम मंदिराचे म्हणत सुधीर दास यांनी ना. रामदास आठवले यांचे स्वागत करून मंदिरात प्रवेशाची विनंती केली.यावेळी ना.रामदास आठवले; त्यांचे सर्व कुटुंबीय ; सर्व बौद्ध उपासक;भदंत सुगत म हाथेरो; भदंत राहुल बोधी महाथेरो रिपब्लिकन पक्षाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाश लोंढे आदी अनेक मान्यवरांनी काळाराम मंदिरात प्रवेश केला.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून दिलेला सर्वधर्मसमभावाचा विचार देशाला तारणार आहे.आम्ही आता बौद्ध आहोत. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला मंदिर प्रवेशाचा नाही तर शाळा प्रवेशाचा संदेश दिला आहे. आम्हाला आज काळाराम मंदिरात प्रवेशा साठी आमच्या स्वागतासाठी मंदिराचे महंत आले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समतेच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याचे हे यश आहे. आम्ही सर्व धर्म सम भाव हा डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला विचार जोपासत आहोत.त्यामुळे आज आम्ही काळाराम मंदिरात प्रवेश केला असल्याचे ना.रामदास आठवले म्हणाले.

## तहसिलदारांनी संवेदनशीलता दाखवत वृद्धेच्या शेवटच्या प्रवासासाठीचा मार्ग केला सुकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : माणूस मेल्यानंतरही इहलोकीचा प्रवास करतांना त्याला मार्ग मिळू नये, यासारखी दुर्दैवी गोष्ट कोणती? अशीच हृदय पिळवटून टाकणारी घटना कोळगाव ता.निफाड येथे घडली. एका वयोवृद्ध महिलेच्या अंत्यसंस्कारासाठी कुटुंबियांना संघर्ष करावा लागला. रस्त्याच्या अंतर्गत वादामुळे महिलेच्या पार्थिवाला अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीकडे नेण्यासाठी मार्गच नव्हता. मात्र, निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी संवेदनशीलता दाखवत वृद्धेच्या शेवटच्या प्रवासासाठीचा मार्ग सुकर केला.

कोळगाव येथील माजी सरपंच ज्ञानेश्वर यशवंत घोटेकर यांच्या ८० वर्षीय मातोश्री गं.भा. चंद्रभागा यशवंत घोटेकर यांना देवाज्ञा झाली. मात्र, नातेवाईकांना त्यांच्या घरी जाण्यासाठी आणि मृतदेह अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीकडे नेण्यासाठी रस्ता नव्हता. हा रस्ता गेल्या कित्येक वर्षांपासून अंतर्गत हेव्यादाव्यांमुळे वादात अडकलेला आहे. त्यामुळे रस्त्याभावी अंत्यसंस्कार कसे करायचे? या विवंचनेत घोटेकर कुटुंबीय होते. त्यांनी निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांना भ्रमणध्वनी वरून परिस्थिती कथन केली. परिस्थितीची जाणीव होताच, तहसिलदारांनी तातडीने देवगावचे मंडळ अधिकारी ज्ञानेश्वर पगार, तलाठी विठ्ठल पोटरे, पुरुषोत्तम निकम, अमोल चव्हाण यांचे पथक घटनास्थळी पाठवले. तेथे रात्री १ वाजेपर्यंत प्रशासनाची बैठक झाली. यावेळी तहसिलदार सातत्याने पथकाच्या संपर्कात होते. भूमी अभिलेख कर्मचारी उपस्थित नसल्याने रस्त्याबाबत ठोस निर्णय घेता येत नव्हता. त्यामुळे त्यांनी ग्रामस्थ आणि प्रतिवादी यांच्याशी चर्चा करत शेतातून अंत्ययात्रा जाऊन द्यावी अशी विनंती केली. त्याच्या विनंतीला मान देऊन वादी नरहरी घोटेकर यांनी शेतातुन अंत्ययात्रा जाण्यास परवानगी दिल्याने तात्पुरता मार्ग काढण्यात आला व दि.२८ फेब्रु.रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार विधी पार पडला. प्रशासनाच्या वेगवान निर्णयामुळे एका कुटुंबाची तगमग संपली. गावकऱ्यांनी तहसीलदार नाईकवाडे यांच्या संवेदनशील आणि त्वरित निर्णय क्षमतेचे कौतुक केले. तहसिलदार यांनी माणुसकीच्या नात्याने घेतलेल्या निर्णयामुळे व संवेदनशील अधिकाऱ्यांमुळेच समाज अजूनही उभा आहे हे या घटनेमुळे सिद्द झाले.

**काय आहे रस्त्याचा वाद?**

पूर्वी कोळगाव - रुई हा शिवरस्ता अस्तित्वात होता. मात्र नजीकच्या साहेबराव दगु घोटेकर व नरहरी दगु घोटेकर यांनी शासकीय मोजणी केल्यानंतर तो त्यांच्या हद्दीत आल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे त्यांनी तो अधिग्रहित केला आहे. मात्र त्यामुळे सध्या शिवरस्ता वापरणाऱ्या शेतकऱ्यांची गैरसोय झाली असून यावर महसूल खात्याने कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## तरुणांनी व्यसनापासून दूर राहावे; तरुणांचे निरोगी आयुष्य ही देशाची प्रगती : प्रदिप पट्टेबहादुर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशिम/प्रतिनिधी : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत श्री.रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिर दत्त ग्राम झाकलवाडी येथे दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी आजचा तरुण आणि व्यसनाधीनता या विषयावर मार्गदर्शक म्हणून लाभलेले जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त मा.रासेयो स्वयंसेवक प्रदिप पट्टेबहादूर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.मनीषा कीर्तने मॅडम,प्रा.विजय वानखेडे, सविधान प्रचार आशिष धोंगडे, आधार संस्थेचे नूर सय्यदयांची उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनातून म्हणाले की. तरुणांमध्ये असलेल्या उत्साह, आशा आणि ऊर्जा यांचा वापर केवळ त्यांचं व्यक्तिमत्व आणि भविष्य घडवण्यासाठी व्हावा, म्हणून त्यांना व्यसनापासून दूर राहणं अत्यंत आवश्यक आहे. व्यसनांमुळे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो, जो देशाच्या प्रगतीसाठी हानिकारक ठरतो. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी जीवन जगाव




तरुण पिढी आपल्या देशाचा कणा आहे. तरुण पिढीच्या खांद्यावर या देशाची धुरा आहे जी नेहमीच बदल, प्रगती आणि कल्पकता याची कास धरून पुढे जाते. तरुणांचे योगदान देशाला स्वातंत्र्य मिळवून देताना फार मोठे आहे. सुखदेव, राजगुरू, मदनलाल धिंग्रा, भगतसिंग, चाफेकर बंधू, चंद्रशेखर आझाद ही तरुण क्रांतिकारकांची प्रातिनिधिक स्वरूपातील नावे आठवली तरी स्फुल्लिंग पेटतं. म्हणजेच स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजपर्यंत विविध क्षेत्रात तरुणांचे योगदान लक्षणीय आहे यात शंका नाही. पण सध्याची परिस्थिती बघता, तरुण पिढीतील काही वर्गाची ऊर्जा चुकीच्या दिशेला किंवा मार्गाला जाऊन भरकटलेली दिसते आणि इथेच समाजातील सुज्ञ व्यक्तींवर दिशादर्शनाची मोठी जबाबदारी आहे.

अनेक तरुण हे व्यसनांमध्ये दारू, तंबाखू, सिगारेट, गांजा, अफू, अन्य अवैध पदार्थांचा समावेश असलेल्या पदार्थांचे सेवन करतात ज्यामुळे शारीरिक आरोग्यावर वाईट परिणाम होतो. व्यसनामुळे मानसिक ताण वाढतो, चिंता, डिप्रेशन, आणि आत्महत्येच्या विचारांना चालना मिळते. निरोगी मानसिक स्वास्थ्य तरुणांसाठी महत्त्वाचे आहे, युवापिढी म्हणजे नव्या विचारांची आणि आधुनिकतेची सांगड घालून पुढे जाणारी.आजचा तरुणच उद्याची दशा आणि दिशा ठरवणार आहे. पण आजच्या तरुणाईला गरज आहे ती आदर्श विचारांची आणि कार्यकुशल नेतृत्वाची, दिशाहीन झालेल्या तरुणांना मार्ग दाखवण्याची गरज आहे. आणि संस्कार रुजवण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केले जाते. असे मार्गदर्शन वेगळी राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण संस्था प्रतिनिधी प्रदिप पट्टेबहादुर यांनी केले. यावेळी या कार्यक्रमाला संविधान प्रचारक अनुभव शिक्षक केंद्र अमरावती वाशिम जिल्हा समन्वय आशिष धोंगडे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. मनीषा कीर्तने,सहकार्यक्रम अधिकारी प्रा.विजय वानखेडे व राष्ट्रीय योजना स्वयंसेवक यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजता ढोले या स्वयंसेविकांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो पि.ओ प्रा.डॉ. मनीषा कीर्तने मॅडम यांनी केले.उपस्थित सर्वांचे आभार शुभम कोकाटे यांनी मानले.

## उमरगा येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी :- धाराशिव व लातूर जिल्ह्यातील नागरिकांसाठी मंगळवारपासून (दि.४व ५मार्च ) या दोन दिवस उमरगा येथील आदर्श महाविद्यालयाच्या प्रांगणात महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तपासणी पासून औषधोपचार, तसेच आवश्यक शस्त्रक्रियापर्यंतची सुविधा राहणार आहे. याशिवाय महार रक्तदान शिबिरासह दिव्यांग आणि वयोवृद्धांना मोफत साहित्य वाटप करण्यात येणार असल्याची माहिती भारतीय जनता पक्षाचे युवा नेते तथा महाआरोग्य शिबिराचे प्रमुख शरण बसवराज पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

माजी केंद्रीय मंत्री भगवान खुबा यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होणार आहे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण एच. पुजार अध्यक्षस्थानी असतील. जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, भाजपचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य यांच्यासह जिल्ह्यातील महायुतीचे अनेक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. बुधवारी ह्रदयरोग, मधुमेह, स्त्रीरोग, नेत्र, कान, नाक, घसा,पोटाचे विकार आधी आजारावरील मोफत तपासणी व औषधोपचार करण्यात येणार आहेत. उमरगा- लोहारा तालुकासह लातूर जिल्ह्यातील येणाऱ्या सर्व रुग्णावर मोफत तपासणी व औषध उपचारासह मोफत शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन शिबिरा निमित्त करण्यात आले आहे. (दि ५)रोजी महारक्तदान शिबिराचे चे देखील आयोजन आहे, तसेच तालुक्यातील व परिसरातील दिव्यांग व वृद्धांना साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.

**भाजप युवा नेते शरण पाटील यांची माहिती**

लातूर, सोलापूर, धाराशिव जिल्ह्यासह उमरगा तालुक्यातील तज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. शिबिरात औषध वाटप कक्ष, रुग्णांच्या जेवणाची व्यवस्था, तसेच रुग्णांना ये- जा करण्यासाठी मोफत वाहन व्यवस्था करण्यात आलेली आहे.

उपक्रमासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविकांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. लायन्स क्लब, विवेकानंद हॉस्पिटल लातूर, महा लॅब,श्रीकृष्ण रक्तपेढीसह विविध संस्थांचे सहकार्य मिळत असल्याचे पाटील यांनी सांगितले.सचिन पाटील, रफिक तांबोळी, शौकत पटेल, योगेश राठोड,दगडू पाटील, महेश माशाळकर उपस्थित होते.

## विर फकीरा यांच्या जयंतीनिमित्त वृद्ध व निराधार लोकांना अन्नदानाने अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी

अक्कलकोट येथे फकीरा दलाच्या वतीने विर फकीरा यांच्या जयंतीनिमित्त त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत वीर फकीराने दुष्काळ सदृश परिस्थिती उद्धवल्याने अन्नावाचून लोकं पाय खोडून मरत होती.एकाला पूरून आले की दुसरा मरून पडायचा अशा परिस्थितीत आपला जीव धोक्यात घालून इंग्रज सैन्याशी दोन हात करत त्यांचा खजाना,धान्याची कोठारे लुटून सर्व जाती धर्मातील लोकांना सम- समान प्रमाणात अन्नधान्य वाटप करून जिवंत ठेवण्यासाठी जिवाचे रान करत धडपडणारा.. आणि सरते शेवटी ओलीस ठेवलेल्या गावकऱ्यांना सोडवण्यासाठी आत्म समर्पण करत खुशाल फासावर जाणाऱ्या वीर फकीरा त्यांच्या कार्यास अनुसरून गरजू,अंध,अपंग,वृद्ध,व निराधार लोकांना अन्नदानाने अभिवादन करण्यात आले.यावेळी फकीरा दल सो. जिल्हाप्रमुख ज्योतिबा पारखे ,शहर उपप्रमुख हर्षवर्धन देडे,सुरेश सोनकांबळे,अंबादास शिंगे,योगीराज पारखे आदि उपस्थित होते.



**खडकवासला कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय**

**क्रीडा व अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती**



# इंदापूरच्या शेती सिंचनासाठी खडकवासला व निरा डाव्या कालव्यातून उन्हाळी हंगामासाठी प्रत्येकी दोन आवर्तने

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे

पुणे ता.१ : इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेती सिंचनासाठी उन्हाळी हंगामात खडकवासला कालव्याला दोन व नीरा डाव्या कालव्याला दोन आवर्तने देण्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. अशी माहिती राज्याचे क्रीडा अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. आज १ मार्च रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या व जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कालवा सल्लागार समितीची बैठक पार पडली. यावेळी खडकवासला कालव्यातून उन्हाळी हंगामासाठी १८ फेब्रुवारी पासून आवर्तन सुरू करण्यात आले आहे. हे आवर्तन संपल्यानंतर शेतकऱ्यांच्या हितासाठी येत्या २५ एप्रिल पासून दुसरे आवर्तन देण्यात यावे. अशी आग्रही मागणी शेतकऱ्यांच्या हितासाठी श्री भरणे यांनी या बैठकीत केली ही आग्रही मागणी विचारात घेऊन दुसरे आवर्तन येत्या २५ एप्रिल पासून सुरू करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना दिले. तर निरा डावा कालव्यातून इंदापूरच्या शेती सिंचनासाठी उन्हाळी हंगामात दोन आवर्तने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार निरा डाव्या कालव्याला ११ मार्च ते ३ मे या कालावधीत ५४ दिवसाचे उन्हाळी हंगामातील पहिले तर ४ मे ते २६ जून या कालावधीत ५४ दिवसाचे दुसरे उन्हाळी हंगामातील आवर्तन शेती सिंचनासाठी दिले जाणार आहे. यावेळी श्री भरणे यांनी या बैठकीत सणसर जोड कालव्याला खडकवासला प्रकल्पाच्या मंजूर पाणी वाटपातील तरतुदीनुसार पाणी सोडणे बंधनकारक असून या सणसर जोड कालव्याला आराखड्यात तरतूद केल्याप्रमाणे पाणी सोडण्यात यावे. व ते २२ गावांना शेती सिंचनासाठी देण्यात यावे अशी आग्रही मागणी या बैठकीत केली. तसेच खडकवासला व निरा डावा दोन्ही कालव्याला पूर्ण क्षमतेने पाणी सोडण्यात यावे. तसेच जास्तीत जास्त काळ इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेती सिंचनासाठी आवर्तन द्यावे. तसेच तरंगवाडी तलावाच्या पाण्यावर इंदापूर शहर व अनेक गावच्या पाणी पुरवठा योजना अवलंबून आहेत. त्यामुळे या तलावात पाणी सोडण्यात यावे. अशी मागणी या बैठकीत श्री भरणे यांनी केली. यावर पाणी परिस्थिती पाहून सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री यांनी दिले.